संदर्भ क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२२-४८९९,
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
दूर.०२२-२७७५१३८५/०२२-२७७५१३८६,
E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in

दिनांक : - २ ऑगस्ट, २०२२

# आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि. १ जुलै, २०२२ पासून करण्यांत येणारी सुधारणा.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२२-८७३, दि.५.२.२०२२ च्या आदेशान्वये दि.१ जानेवारी, २०२२ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/कि.वे.अ./विभ/२०२२(२)/कार्या-१०/२१८३६, दि.१.८.२०२२, अन्वये दि.१ जुलै, २०२२ ते दि.३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.२,१०६.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. २.०८.२०२२ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. १ जुलै, २०२२ ते दि.३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीकरीतां रु.२,१०६.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०१७-७१८८, दि.१७ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

<u>दि. १ जुलै, २०२२ ते दि.३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीकरीतां वेतन व भत्ते यांचा तक्ता.</u>

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | शैक्षणिक भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.२५ %) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, शैक्षणिक भत्त्यावर, रजाकालीन प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ महिला सु.रक्षक | १२,०८२.०० | २,१०६.०० | २,८३८.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २०,५२६.०० | ६,४२०.०० | १३८.०० | २७,०८४.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १२,३५७.०० | २,१०६.०० | २,८९३.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २०,८५६.०० | ६,५४५.०० | १४०.०० | २७,५४१.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १३,०५७.०० | २,१०६.०० | ३,०३३.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २१,६९६.०० | ६,८६१.०० | १४४.०० | २८,७०१.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | १३,२८२.०० | २,१०६.०० | ३,०७८.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २१,९६६.०० | ६,९६३.०० | १४६.०० | २९,०७५.०० |
| ५ | सुरक्षा अधिकारी | १३,७३२.०० | २,१०६.०० | ३,१६८.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २२,५०६.०० | ७,१६७.०० | १४८.०० | २९,८२१.०० |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १४,१८२.०० | २,१०६.०० | ३,२५८.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २३,०४६.०० | ७,३७०.०० | १५१.०० | ३०,५६७.०० |

***मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन**

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.२५% दराने व घरभाडे भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सूचित करण्यांत येते की, त्यांनी नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे दि.१ जुलै, २०२२ पासून वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guards Board for Br. Bombay & Thane District
Sanpada, Navi Mumbai

सही/-
(अशोक ल. डोके)
**कामगार उप आयुक्त** व
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
प्रति,
मे. .............................................., नों.क्र. ........., युनिट क्र. .........
..................................................................

**This being a computerised printed copy, signature is not required.*